# आदेश

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ६ सप्टेंबर, २०१२.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.

क्रमांक : सीएसएल-२०१२/प्र.क्र. ४०२/१५-स. - ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) च्या कलम ७३ (१ कख) मधील तरतुदीनुसार गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या समितीच्या प्रत्येक सदस्याने, समिती सदस्य झाल्यापासून पंचेचाळीस दिवसांत, असा सदस्य संस्थेच्या हितास बाधक करणाऱ्या सर्व केलेल्या अथवा करण्याचे टाळलेल्या कृतीला वैयक्तिकरित्या अथवा सामुहिकरित्या जबाबदार राहील असे बंधपत्र करुन देणे बंधनकारक आहे आणि जो सदस्य असे बंधपत्र करुन देऊ शकणार नाही त्याचे सदस्यत्व संपुष्टात आल्याचे समजण्यात येईल अशी तरतूद आहे;

आणि ज्याअर्थी, बहुतांश गृहनिर्माण सहकारी संस्थांचे सदस्य आपले दैनंदिन व्यवहार सांभाळून केवळ सेवाभावी वृत्तीने या संस्थांचे व्यवस्थापक समिती सदस्य म्हणून काम करतात, त्यामुळे अशा संस्थांच्या व्यवस्थापक समितीच्या नवनिर्वाचित सदस्यांना, उपरोक्त पोटकलम (१ कख) मधील बंधपत्र करुन देण्याच्या तरतुदीपासून सूट मिळावी अशी विनंती करणारी अनेक निवेदने शासनाकडे प्राप्त झाली आहेत;

आणि ज्याअर्थी, अशा निवेदनांचा विचार केल्यावर लोकहितास्तव तसेच सहकार चळवळ वृध्दींगत होण्यासाठी नवनिर्वाचित सदस्यांना बंधपत्र करुन देण्यापासून सूट देणे हितकारक आहे असे शासनाचे मत झाले आहे;

त्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाच्या कलम १५७ मधील शक्तींचा आणि शासनास समर्थ करणाऱ्या अन्य अधिकारांचा उपयोग करुन महाराष्ट्र शासन उपरोक्त अधिनियमाच्या कलम ७३ पोटकलम (१ कख) मधील बंधपत्र करुन देण्याच्या तरतुदींमधून सहकारी गृहनिर्माण संस्थांना सूट देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( राजगोपाल देवरा)
शासनाचे सचिव.